
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादकः मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक १७ । पाने २।
DIGITAL EDITION



मुख्यमंत्री तिकडे बंगालमध्ये; इकडे महिलांचे विनयभंग होताहेत
(पान २ वर)

Selected

### पाळधीतील तरुणाचा उष्माघाताने मृत्यू

पाळधी बुद्रुक : रहिवासी जितेंद्र उर्फ टिनू दगडू पाटील (वय ३८) यांचा उष्माघातामुळे दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जितेंद्र पाटील हे कामानिमित्त बाहेर गेले असताना दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास त्यांना अचानक डोकेदुखी व चक्कर येऊ लागली. वाढत्या उष्णतेमुळे त्यांची प्रकृती झपाट्याने खालावत गेली. सोबत काम करणाऱ्या सहकाऱ्यांनी तातडीने त्यांना डॉक्टरांकडे नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, दुपारी सुमारे ४.३० वाजण्याच्या दरम्यान रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्यांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचे समजते. सध्या जळगाव जिल्ह्यासह परिसरात तापमानात मोठी वाढ झाली असून, उष्माघाताच्या घटना वाढत आहेत. नागरिकांनी दुपारच्या कडाक्याच्या उन्हात बाहेर पडताना आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. जितेंद्र पाटील यांच्या अकाली निधनामुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, गावात शोककळा पसरली आहे.

# राज्य सरकारी कर्मचारी-शिक्षकांचा बेमुदत संप दुसऱ्या दिवशीही कायम!

## १७ लाख कर्मचारी-शिक्षकांचा सहभाग; कामकाज ठप्प, २२ एप्रिललाही आंदोलन सुरूच

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** महाराष्ट्र राज्यातील सुमारे १७ लाख सरकारी कर्मचारी व शिक्षकांनी २१ एप्रिलपासून सुरू केलेला बेमुदत संप दुसऱ्या दिवशीही कायम राहणार असून, २२ एप्रिल रोजीही आंदोलन सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या संपामुळे मंत्रालयासह सर्व ३६ जिल्ह्यांतील प्रशासकीय कामकाज मोठ्या प्रमाणावर ठप्प झाले आहे. संपाच्या पहिल्याच दिवशी राज्यभरात मोठा प्रतिसाद मिळाला. विविध जिल्ह्यांमध्ये कर्मचारी-शिक्षक ठरवलेल्या ठिकाणी एकत्र येऊन आंदोलनात सहभागी झाले. घोषणाबाजी, सभांद्वारे सरकारविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. शाळा-महाविद्यालये बंद; आरोग्य यंत्रणेलाही फटका या संपाचा परिणाम शिक्षण व आरोग्य क्षेत्रावरही दिसून आला. राज्यातील अनेक शाळा-महाविद्यालये बंद राहिली, तर आरोग्य सेवेत कार्यरत परिचारिकांनीही सकाळी ७.३० वाजल्यापासून आंदोलनात सहभाग घेतला. त्यामुळे दैनंदिन सेवा विस्कळीत झाल्याचे चित्र होते. सरकारसोबत अनौपचारिक चर्चा दरम्यान, संध्याकाळी सुमारे ४.३० वाजता मंत्रालय येथे अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या बोलावण्यानुसार संघटनांच्या प्रतिनिधींशी अनौपचारिक चर्चा झाली. या चर्चेत प्रलंबित मागण्यांवर



मुख्यमंत्री व मुख्य सचिव पातळीवर लवकरच निर्णायक चर्चा होणार असल्याचे सांगण्यात आले. सूत्रांच्या माहितीनुसार, २२ एप्रिल संध्याकाळी किंवा २३ एप्रिल दुपारी मुख्य सचिव पातळीवर औपचारिक बैठक होण्याची शक्यता आहे. मात्र, तोपर्यंत संप मागे घेण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे संघटनांकडून स्पष्ट करण्यात आले आहे. समन्वय समितीचा निर्धार राज्य समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी सांगितले की, "संपाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील." या भूमिकेमुळे पुढील काही दिवस प्रशासनावर ताण वाढण्याची शक्यता आहे. प्रशासनावर ताण वाढणार संपामुळे महसूल, शिक्षण, आरोग्य आणि इतर विभागातील कामकाज ठप्प झाल्याने नागरिकांना विविध सेवांसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. सरकार-कर्मचारी यांच्यातील चर्चेत तोडगा निघेपर्यंत ही परिस्थिती कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.राज्यभरात सुरू असलेल्या या बेमुदत संपामुळे प्रशासनावर मोठा ताण निर्माण झाला असून, सर्वांचे लक्ष आता सरकार-कर्मचारी चर्चेकडे लागले आहे.

### दैनंदिन सेवा विस्कळीत झाल्याचे चित्र

या संपामुळे मंत्रालयासह सर्व ३६ जिल्ह्यांतील प्रशासकीय कामकाज मोठ्या प्रमाणावर ठप्प झाले आहे. संपाच्या पहिल्याच दिवशी राज्यभरात मोठा प्रतिसाद मिळाला. विविध जिल्ह्यांमध्ये कर्मचारी-शिक्षक ठरवलेल्या ठिकाणी एकत्र येऊन आंदोलनात सहभागी झाले. घोषणाबाजी, सभांद्वारे सरकारविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.शाळा-महाविद्यालये बंद; आरोग्य यंत्रणेलाही फटका या संपाचा परिणाम शिक्षण व आरोग्य क्षेत्रावरही दिसून आला. राज्यातील अनेक शाळा-महाविद्यालये बंद राहिली, तर आरोग्य सेवेत कार्यरत परिचारिकांनीही सकाळी ७.३० वाजल्यापासून आंदोलनात सहभाग घेतला. त्यामुळे दैनंदिन सेवा विस्कळीत झाल्याचे चित्र होते. सरकारसोबत अनौपचारिक चर्चा दरम्यान, संध्याकाळी सुमारे ४.३० वाजता मंत्रालय येथे अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या बोलावण्यानुसार संघटनांच्या प्रतिनिधींशी अनौपचारिक चर्चा झाली. या चर्चेत प्रलंबित मागण्यांवर मुख्यमंत्री व मुख्य सचिव पातळीवर लवकरच निर्णायक चर्चा होणार असल्याचे सांगण्यात आले. सूत्रांच्या माहितीनुसार, २२ एप्रिल संध्याकाळी किंवा २३ एप्रिल दुपारी मुख्य सचिव पातळीवर औपचारिक बैठक होण्याची शक्यता आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## भूषण काका गुरव यांना पोलीस उपनिरीक्षक पदावर बढती

### दीर्घ प्रतीक्षेनंतर यश



जन सम्राट टाईम्स

**पालू । गुरुदत्त वाकदेकर :** पालू गावातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व काका गुरव यांना पोलीस विभागात पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदावर बढती मिळाल्याने गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सुमारे दोन महिन्यांपूर्वी अर्हता पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांच्या या यशाचा गावकऱ्यांकडून मोठ्या आनंदात गौरव करण्यात येत आहे. काका गुरव यांनी सन २०१३ मध्ये पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा उत्तीर्ण केली होती. मात्र, 'मॅट कोर्ट' प्रकरण प्रलंबित असल्यामुळे त्यांच्या पदोन्नती प्रक्रियेला विलंब झाला. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे त्यांनी अखेर हे मानाचे पद प्राप्त केले आहे. आपल्या कर्तव्यदक्षतेमुळे त्यांनी पोलीस खात्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे. प्रामाणिकपणा, जिद्द आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर त्यांनी हे यश मिळवले आहे. काका गुरव यांची ही कामगिरी केवळ वैयक्तिक यश न राहता संपूर्ण पालू गावासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. त्यांच्या यशामुळे गावातील तरुणांमध्ये नवी उमेद निर्माण झाली असून, स्पर्धा परीक्षा आणि शासकीय सेवेकडे वळण्याची प्रेरणा मिळत आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या अडचणींवर मात करत त्यांनी मिळवलेले हे यश अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. संयम, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर कोणतीही गोष्ट साध्य करता येते, याचे जिवंत उदाहरण काका गुरव यांनी घालून दिले आहे.

#### उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा

भविष्यातही काका गुरव यांनी आपल्या कर्तृत्वाने अधिक उंच भरारी घ्यावी, समाजसेवा अधिक प्रभावीपणे करावी आणि पालू गावाचे नाव राज्यभर उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी उत्तम आरोग्य, सातत्यपूर्ण यश आणि प्रगतीच्या मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## लोप पावणारी परंपरा बाजारात; खापरावरच्या पुरणपोळीला उत्स्फूर्त प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स

**जळगाव:** पारंपरिक खापरावर भाजलेल्या पुरणपोळीची परंपरा आता नव्या रूपात बाजारपेठेत अवतरली असून, याला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. खान्देशातील आखाजी सण आणि खापरावरची पुरणपोळी हे अतूट नाते मानले जाते. मात्र, बदलत्या जीवनशैलीमुळे घराघरातून ही परंपरा लोप पावत असताना, स्थानिक महिलांनी पुढाकार घेत ती पुन्हा जिवंत करण्याचा प्रयत्न केला आहे. यंदा जळगाव शहरातील विविध भागांत खापरावरच्या पुरणपोळीचे स्टॉल उभारण्यात आले होते. गणेश कॉलनी, बहिणाबाई उद्यान, प्रभात चौक, पिंप्राळा अशा सुमारे १० ठिकाणी सकाळपासूनच



खवय्यांनी गर्दी केली. सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. या उपक्रमाला मिळालेल्या प्रतिसादाचे चित्र म्हणजे, अवघ्या एका दिवसात तब्बल २०० किलो तयार पुरणपोळ्यांची विक्री झाली. पारंपरिक चवीसाठी ओळखल्या जाणाऱ्या या खापरपोळीला ग्राहकांनी मोठ्या प्रमाणावर पसंती दिली. महागाईचा परिणाम, तरीही चवीत तडजोड नाही गतवर्षी ७० रुपयांना मिळणारी एक खापरपोळी यंदा ८० रुपयांवर पोहोचली आहे. गॅस सिलिंडर, साखर आणि डाळींच्या वाढलेल्या किमतीमुळे दर वाढले असले तरी ग्राहकांनी त्याकडे दुर्लक्ष करत चवीला प्राधान्य दिले. अनेक ग्राहक सकाळी ७ वाजल्यापासूनच स्टॉलवर पोहोचले होते. महिलांचा अभिनव उपक्रम शहरीकरणामुळे घराघरात चूल पेटवणे किंवा खापरावर पोळी बनवणे कठीण झाले आहे. ही गरज ओळखून स्थानिक कष्टकरी महिलांनी खापरपोळी विक्रीचा उपक्रम सुरू केला. या उपक्रमामुळे त्यांना रोजगाराचे साधन मिळाले, तसेच पारंपरिक खाद्यसंस्कृती जपण्यासही हातभार लागला आहे.

## राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांच्या संपाला संमिश्र प्रतिसाद!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई:** जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करा, यासारख्या प्रलंबित मागण्यांसाठी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या मध्यवर्ती संघटनेने पुकारलेल्या संपाला पहिल्या दिवशी राज्यात संमिश्र प्रतिसाद मिळाला.

राज्याचे प्रशासकीय केंद्र असलेल्या मंत्रालयातील ७ हजार ६७८ कर्मचाऱ्यांपैकी अर्धेअधिक ३ हजार ६१९ कर्मचारी उपस्थित होते. ठाणे, पुणे, नाशिक येथील जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरुन आंदोलने केली. त्याचा परिणाम शासकीय कामकाजावर झाला. आरोग्य सेवेतील शासकीय कर्मचारी संपावर गेल्याने रुग्णालयांच्या कामकाजावर परिणाम झाला. त्याचा फटका रुग्णांना बसला. कर्मचाऱ्यांच्या



संपामुळे विविध विभागांतील कामांची गती मात्र मंदावली होती.

महत्त्वाच्या विभागांतील सेवांवर परिणाम झाल्याचे दिसून आले.. संपात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा दिला आहे पण ही कारवाई सरकारने पहिल्या दिवशी केली नाही.

राज्यातील १७ लाख शासकीय कर्मचारी या संपात सहभागी होणार असल्याचा दावा संघटनेने केला होता. यातील अर्धे कर्मचारी सहभागी असल्याचे चित्र आहे. मंत्रालयासह राज्यातील ३६ जिल्ह्यात संप यशस्वी झाल्याचा दावा सरकारी, निमसरकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीने केला आहे. संपाच्या पार्श्वभूमीवर बुधवार किंवा गुरुवार पर्यंत सचिव पातळीवर चर्चा होईल, तोपर्यंत हा संप सुरु असल्याचे समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी सांगितले.

## खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी अवघ्या २४ तासांत जेरबंद; पोलिसांची धडाकेबाज कारवाई

जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** चोपडा शहरातील खून प्रकरणात पोलिसांनी अतिशय वेगाने कारवाई करत अवघ्या २४ तासांच्या आत दोन आरोपींना जेरबंद केले आहे. स्थानिक गुन्हे शाखा आणि चोपडा पोलिसांच्या संयुक्त कारवाईमुळे या गुन्ह्याचा जलद उलगडा झाला. दि. १९ एप्रिल २०२६ रोजी रात्री ९ ते २० एप्रिल रोजी सकाळी ८.३० दरम्यान चोपडा-धरणगाव रोडवरील पाटचारी परिसरात प्रदीप राजेंद्र महाजन (वय ३३, रा. तारामती नगर, चोपडा) यांचा अज्ञात हत्याराने चेहरा व डोके ठेचून खून करण्यात आला होता. पूर्व वैमनस्यातून हा खून करण्यात आल्याची माहिती तपासात समोर आली आहे. या प्रकरणी चोपडा शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यातील



आरोपी विजय भास्कर वैदकर (रा. भाग्योदय नगर, चोपडा) आणि निर्मल संजय बडगुजर (रा. चिंच चौक, चोपडा) हे गुन्हा केल्यानंतर फरार झाले होते. गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी मुंबईकडे पळाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तातडीने मुंबईकडे रवाना झाले. दरम्यान, आरोपी रेल्वेने परत जळगावकडे निघाल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी नाशिक येथून रेल्वेत बसून शोधमोहीम राबवली. नाशिक ते चाळीसगाव दरम्यान चालत्या रेल्वेतच दोन्ही आरोपींना शिताफीने ताब्यात घेण्यात आले. सुरुवातीला आरोपींनी गुन्ह्याची कबुली देण्यास नकार दिला. मात्र पोलिसांनी विश्वासात घेऊन केलेल्या चौकशीत त्यांनी पूर्व वैमनस्यातून खून केल्याची कबुली दिली.ही कारवाई पोलीस अधीक्षक जळगाव, अपर पोलीस अधीक्षक चाळीसगाव, उपविभागीय पोलीस अधिकारी चोपडा यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून आरोपींना अवघ्या २४ तासांत अटक करण्यात यश आले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## नाशिकमध्ये राज्यस्तरीय कलावंत पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

### विविध कला क्षेत्रातील गुणवंतांचा सन्मान; तळागाळातील कलावंतांना व्यासपीठ

जन सम्राट टाईम्स

**नाशिक: गुरुदत्त वाकदेकर ।** नाशिक येथे कलावंत विचार मंच, कमल फिल्म प्रोडक्शन आणि कमल म्युझिक मराठी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय कलावंत पुरस्कार वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अध्यक्ष सुनील मोंढे यांच्या स्वागताध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाने कला क्षेत्रातील अनेक मान्यवरांना एकत्र आणले. हा सोहळा पं. सा. नाट्यमंदिर येथे रविवार, १८ एप्रिल २०२६ रोजी पार पडला. कार्यक्रमास ज्येष्ठ साहित्यिक सुभाष सोनवणे, अभिनेत्री दिपाली कुलकर्णी, प्रा. सोमनाथ मुठाळ आणि कवयित्री सुनीता वाळुंज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विविध कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कलाकारांचा यावेळी गौरव करण्यात आला. राज्यभरातील कलावंतांचा गौरव या सोहळ्यात आंतरराष्ट्रीय बाल कवयित्री अजया मुळीक (पुणे), अभिनेत्री राणी जाधव (पुणे), सुमती टापसे (नाशिक), अजिंक्य सोनवणे (अहिल्यानगर), प्रा. छाया बोरकर (गोंदिया), अरुण शेलार (नाशिक),




वाल्मिक मेश्राम (भंडारा), तन्वी भदाणे (धुळे), शिवाजी लोमंटे (नांदेड), अहमद शेख (हिंगोली), देवश्री बावनथडे (नागपूर) आणि डॉ. सुकीर्ती शर्मा (मुंबई) यांसह अनेक मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. याशिवाय ज्ञानेश्वर थोटे (नेवासा), शोभा धामस्कर (गोवा), ज्ञानदेव शिंदे (संगमनेर), राजेश्वरी सावळे (नाशिक), प्रमोद पंडीत (लोणी), दत्तू दाणी (नाशिक), संजय पाटील (धुळे), अंकुश मांडेकर (पुणे), अंजली गादे (लातूर), धनश्री वाघ (अहिल्यानगर), महेश लोखंडे (श्रीरामपूर), सुभांगी मेहेत्रे (नाशिक), दिपक गरुड (बीड), नंदकुमार पाटील (जळगाव) आणि अमित काकडे (मुंबई) यांचाही गौरव करण्यात आला. कलावंतांसाठी प्रेरणादायी व्यासपीठ प्रमुख अतिथी सुभाष सोनवणे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, कलावंत विचार मंच ही संस्था गेल्या दहा वर्षांपासून तळागाळातील कलाकारांसाठी सातत्याने कार्यरत आहे. राज्यभरातून प्रस्ताव मागवून दर्जेदार कलाकारांची निवड करून त्यांचा सन्मान करण्याची परंपरा संस्थेने जपली असल्याचे त्यांनी नमूद केले.


#### सुयोग्य आयोजनाने रंगला सोहळा

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश पाटील लिंबे वडगावकर यांनी केले, तर प्रा. सोमनाथ मुठाळ यांनी आभार मानले. या यशस्वी आयोजनासाठी सुप्रिया गवळे, आनंद साळवे, रज्जाक शेख आदींनी विशेष परिश्रम घेतले. विविध कला क्षेत्रातील प्रतिभावंतांचा गौरव करणारा हा सोहळा उपस्थितांसाठी प्रेरणादायी आणि उत्साहवर्धक ठरला.

## 'प्रेरणादायी विचार' पुस्तकाला कॉपीराइट नोंदणी; लेखक प्रकाश तेली यांची साहित्यविश्वात नवी झेप

जन सम्राट टाईम्स


**पुणे :** साहित्यविश्वासाठी अभिमानाची बातमी म्हणून कवी, लेखक, पत्रकार आणि गीतकार प्रकाश तेली यांच्या 'प्रेरणादायी विचार' या पुस्तकाला भारत सरकारच्या नवी दिल्ली येथील बौद्धिक संपदा कार्यालया कडून अधिकृत कॉपीराइट नोंदणी प्राप्त झाली आहे. आजच त्यांना 'कॉपीराइट निबंधकां'ची स्वाक्षरी असलेले अधिकृत नोंदणी प्रमाणपत्र मिळाल्याची माहिती त्यांनी दिली. या यशाबद्दल बोलताना प्रकाश तेली यांनी आपल्या वाचक, हितचिंतक आणि स्नेहींप्रती कृतज्ञता व्यक्त केली. "आपल्या सर्वांच्या पाठिंब्यामुळेच हे यश शक्य झाले," असे त्यांनी नमूद केले. 'प्रेरणादायी विचार' या



पुस्तकामध्ये जीवनाला दिशा देणारे, सकारात्मकता वाढवणारे आणि प्रेरणा देणारे विचार मांडले असून वाचकांकडून या पुस्तकाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. उल्लेखनीय म्हणजे, प्रकाश तेली हे घोषवाक्य व काव्य लेखनात विश्वविक्रम धारक असून साहित्य, पत्रकारिता आणि गीतलेखन क्षेत्रात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यांच्या या नव्या यशामुळे साहित्य क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले .

✓ » Selected

## पुणे जिल्हाध्यक्षपदी ॲड. धनंजय बुद्धिवंत यांची नियुक्ती



पुणे : भारतीय राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (महासंघ) इंटकच्या पुणे जिल्हाध्यक्षपदी ॲड. धनंजय तुकाराम बुद्धिवंत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे पुणे जिल्ह्यातील कामगार संघटनांना नवे नेतृत्व मिळाले आहे.ही नियुक्ती इंटकचे राष्ट्रीय अध्यक्ष हौशिल प्रसाद शर्मा यांच्या आदेशानुसार करण्यात आली असून, नियुक्तीपत्र प्रदेशाध्यक्ष ॲड. सुभाष माछरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.नियुक्ती स्वीकारताना ॲड. धनंजय बुद्धिवंत यांनी कामगारांच्या हिताचे रक्षण करणे, त्यांना न्याय मिळवून देणे आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे हे इंटकचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे सांगितले. तसेच, पुणे जिल्ह्यातील सर्व कामगारांना एकत्रित करून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या नियुक्तीमुळे स्थानिक कामगार चळवळीला बळ मिळणार असून, विविध क्षेत्रातील कामगारांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी अधिक प्रभावीपणे काम होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मुख्यमंत्री तिकडे बंगालमध्ये; इकडे महिलांचे विनयभंग होताहेत

## उद्धव ठाकरे यांची भाजपवर टीका

जन सम्राट टाईम्स



**मुंबई :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आपले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तिकडे बंगालमध्ये, इकडे महिला विनयभंग होताहेत, अंमली पदार्थांची प्रकरणे बाहेर येते आहेत. पण यांना बंगाल जिंकायचाय. दोन लाख सीआरपीएफचे जवान तिकडे उतरवले, पश्चिम बंगालमध्ये वाघीण एकटीच लढतेय, त्या जिंकल्याच पाहिजेत, असे विधान करीत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी ममता बॅनर्जी यांना पाठिंबा देताना भाजपवर जोरदार टीका केली. भारतीय कामगार सेनेची ५८वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवारी दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिर नाट्यगृहात पार पडली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी मार्गदर्शन करताना एखाद्या संघटनेने ५८ वर्षे नेतृत्व करणे येड्या गबाळ्याचे काम नाही. यावेळी शिवसेनेचे दिवंगत नेते दत्ताजी साळवी यांची आठवण सांगताना त्यांनी संघटनेचे काम करण्यासाठी आली नोकरी सोडली. त्यांनी केलेल्या कामामुळे हजारो लोकांना नोकऱ्या मिळाल्या, याची आठवण त्यांनी सांगितली. लोक येतात जातात त्यांची कर्म त्यांच्यासोबत जातात. ज्यांना जायचे असेल त्यांनी जरूर जा, पण जे गेलेत त्यांचे काय झालेय हे त्यांना विचारा. माणसे विकली जात आहेत. युनियन क्षेत्रात दुकानदारी सुरू आहे, असे म्हणत कामगार क्षेत्रातील सद्यस्थितीवर उद्धव ठाकरेंनी भाष्य केले. अमेरिका इराण युद्ध सुरू आहे, ते लेझीम सारखे चालू आहे. दुबईमध्ये उत्तर भारतीय काम करत आहेत. देश म्हणतोय परत या...पण ते म्हणताय देशात येऊन बेकारीने मरण्यापेक्षा आम्ही बॉम्बने मरू. मेलो तरी चालेल पण काम सोडून माझ्या देशात जाणार नाही. असे ते कामगार का म्हणताहेत याकडे कोणाचे लक्ष जात नाही, असे म्हणत ठाकरेंनी नाव न घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला. नारी शक्ती विधेयकावरून गदारोळ सुरू आहे. मुख्यमंत्री म्हणतायत विरोधकांचे बुरखे फाडणार, अरे आम्ही हिंदू आहोत बुरखे काय फाडणार? मुख्यमंत्री लोकसभेत होते का, असा सवाल त्यांनी केला. महिला आरक्षणाबद्दल एवढा कळवळा असेल तर संसदेचे उद्‌घाटन करताना आणि अयोध्या राम मंदिरावेळी राष्ट्रपतींना का बोलवले नाही? त्या आदिवासी आहेत म्हणून का? असेही उद्धव ठाकरे म्हणाले. महिला आरक्षण लागू करा मी आजसुद्धा म्हणतो लागू करा, हा नवा विषय नाही, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. यावेळी त्यांनी लोकसत्ताचा अग्रलेख वाचा रवीश कुमार यांचा एपिसोड पाहा, असेही सुचवले. राज्य कुटुंब नियोजन कार्यक्रम चांगल्याप्रकारे राबवत असताना मोहन भागवत मुले जन्माला घाला सांगताहेत, मुले जन्माला घाला? त्यांना पोसणार कोण? त्यानंतरच्या बेकारीचे काय, असा सवाल त्यांनी केला. यावेळी पहलगाम हल्ल्याला एक वर्ष झाले तरी अतिरेकी का पकडले गेले नाहीत, ते कुठे गेले कुठे असा सवाल त्यांनी केला.उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आपले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तिकडे बंगालमध्ये, इकडे महिला विनयभंग होताहेत, अंमली पदार्थांची प्रकरणे बाहेर येते आहेत. पण यांना बंगाल जिंकायचाय. दोन लाख सीआरपीएफचे जवान तिकडे उतरवले, पश्चिम बंगालमध्ये वाघीण एकटीच लढतेय, त्या जिंकल्याच पाहिजेत, असे विधान करीत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी ममता बॅनर्जी यांना पाठिंबा देताना भाजपवर जोरदार टीका केली. भारतीय कामगार सेनेची ५८वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवारी दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिर नाट्यगृहात पार पडली. यांनी मार्गदर्शन करताना एखाद्या संघटनेने ५८ वर्षे नेतृत्व करणे येड्या गबाळ्याचे काम नाही. यावेळी शिवसेनेचे दिवंगत नेते दत्ताजी साळवी यांची आठवण सांगताना त्यांनी संघटनेचे काम करण्यासाठी आली नोकरी सोडली. त्यांनी केलेल्या कामामुळे हजारो लोकांना नोकऱ्या मिळाल्या, याची आठवण त्यांनी सांगितली. लोक येतात जातात त्यांची कर्म त्यांच्यासोबत जातात. ज्यांना जायचे असेल त्यांनी जरूर जा, पण जे गेलेत त्यांचे काय झालेय हे त्यांना विचारा. माणसे विकली जात आहेत. युनियन क्षेत्रात दुकानदारी सुरू आहे, असे म्हणत कामगार क्षेत्रातील सद्यस्थितीवर उद्धव ठाकरेंनी भाष्य केले. अमेरिका इराण युद्ध सुरू आहे, ते लेझीम सारखे चालू आहे. दुबईमध्ये उत्तर भारतीय काम करत आहेत. देश म्हणतोय परत या...पण ते म्हणताय देशात येऊन बेकारीने मरण्यापेक्षा आम्ही बॉम्बने मरू. मेलो तरी चालेल पण काम सोडून माझ्या देशात जाणार नाही.

### त्या आदिवासी आहेत म्हणून का?

मुख्यमंत्री लोकसभेत होते का, असा सवाल त्यांनी केला. महिला आरक्षणाबद्दल एवढा कळवळा असेल तर संसदेचे उद्‌घाटन करताना आणि अयोध्या राम मंदिरावेळी राष्ट्रपतींना का बोलवले नाही? त्या आदिवासी आहेत म्हणून का? असेही उद्धव ठाकरे म्हणाले. महिला आरक्षण लागू करा मी आजसुद्धा म्हणतो लागू करा, हा नवा विषय नाही, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. यावेळी त्यांनी लोकसत्ताचा अग्रलेख वाचा रवीश कुमार यांचा एपिसोड पाहा, असेही सुचवले. राज्य कुटुंब नियोजन कार्यक्रम चांगल्याप्रकारे राबवत असताना मोहन भागवत मुले जन्माला घाला सांगताहेत, मुले जन्माला घाला? त्यांना पोसणार कोण? त्यानंतरच्या बेकारीचे काय, असा सवाल त्यांनी केला.

# रायगड जिल्ह्यात पाणीटंचाईच्या झळा!



जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** रायगड जिल्ह्यात पाणीटंचाईच्या झळा आता अधिक तीव्र होत असून ग्रामीण भागातील नागरिकांचे हाल सुरू झाले आहेत. धरणांतील जलसाठा झपाट्याने घटत असल्याने अनेक गावांमध्ये दोन ते तीन दिवसाआडच पाणीपुरवठा होत आहे. परिणामी महिलांना व लहान मुलांना पाण्यासाठी दोन-तीन किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे.सध्या जिल्हयातील २० गावे आणि ८५ वाडया तहानलेल्या असून त्यांना २७ टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. पेण तालुक्यातील वाशी व सारेभाग परिसरात टंचाईची सर्वाधिक झळ बसली आहे. ४ गावे आणि ४८ वाड्यांमध्ये भीषण टंचाई निर्माण झाली आहे. या भागात प्रशासनाला टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा लागला असून सध्या १२ टँकरच्या सहाय्याने नागरिकांची तहान भागवली जात आहे. त्याखालोखाल महाड तालुक्यातील ७ गावे आणि ३२ वाडयांना टँकरने पाणी पुरवण्याची वेळ आली आहे. जिल्हयात १०५ गावे वाडया तहानलेली असून जवळपास 36 हजार लोकसंख्येला पाणीटंचाईच्या झळा सहन कराव्या लागत आहेत.कोलाड पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील २८ पैकी सात धरणांमध्ये ४० टक्क्यांहून कमी पाणीसाठा उरला आहे. पाणीपुरवठ्यात २० ते २५ टक्क्यांची कपात करण्यात आली असून अनेक गावांना एक ते दोन दिवसाआड पाणी दिले जात आहे. जसजसा उन्हाळा वाढतो आहे तसतशा टंचाईच्या झळा अधिक तीव्र होत चालल्या आहेत. मागील आठवडयात जिल्हयात ७२ गावे वाडया टंचाईग्रस्त होत्या. तेव्हा १५ टँकरने पाणी पुरवले जात होते. आठवडाभरात १२ टँकर वाढवण्याची वेळ प्रशासनावर आली आहे.जिल्ह्यात पुरेसा पाऊस होऊनही दरवर्षी पाणीटंचाईचे संकट उभे राहत असल्याने नियोजनाच्या अभावावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. कायमस्वरूपी उपाययोजना करण्याऐवजी तात्पुरत्या उपायांवर भर दिला जात असल्याने वर्षानुवर्षे त्याच गावांना टंचाईचा सामना करावा लागत आहे. मागील वर्षीच्या टंचाईच्या आकडेवारीवर नजर टाकली तर जिल्हयातील पाणीसमस्येची भीषणता समोर येते. जून २०२५ अखेर ४३ गावे आणि २४२ वाडयांना टँकरने पाणी पुरवण्याची वेळ आली होती.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# पदोन्नती रखडल्याने तहसीलदारांत असंतोष

## बावनकुळेंची आज भेट घेणार

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** महसूल विभागाने सेवाज्येष्ठता यादीत केलेल्या तांत्रिक चुकांचा फटका पुणे विभागातील तहसीलदारांना बसला आहे. या चुकीमुळे सन २०१३ नंतरच्या तहसीलदारांना उपजिल्हाधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली. मात्र, २०१३ आधीच्या तुकडीतील तहसीलदार अजूनही पदोन्नतीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे हे अधिकारी आज, बुधवारी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन पदोन्नतीतील अन्याय दूर करण्याची मागणी करणार आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने २००४ मध्ये २० अधिकाऱ्यांची नायब तहसीलदारपदी निवड केली होती. या २० अधिकाऱ्यांना पुढे तहसीलदार म्हणून पदोन्नती मिळाली. २०२३ मध्ये महसूल विभागाच्या तांत्रिक चुकांमुळे तहसीलदारांच्या सेवाज्येष्ठता यादीत घोळ झाला. त्यामुळे २००७ मध्ये नायब तहसीलदार म्हणून निवड झालेले अधिकारी २०१४ नंतर तहसीलदार झाले, मात्र पुणे विभागातील हे २० अधिकारी अजूनही तहसीलदार पदावर आहेत. पुणे विभागातील या तहसीलदारांची सेवाज्येष्ठता यादीमधील झालेली तांत्रिक चूक दुरुस्त करण्यासा प्रस्ताव पुणे विभागीय आयुक्तांनी महसूल विभागाला सादर केला आहे. या प्रस्तावानुसार सेवाज्येष्ठता यादी दुरुस्त करून २० तहसीलदारांना पदोन्नती



देण्याऐवजी तुलनेने कनिष्ठ असलेल्या ५१ तहसीलदारांना उपजिल्हाधिकारी म्हणून पदोन्नती देण्याचा घाट घालण्यात आल्याचा समजते.

### आश्वासन देऊन चार महिने उलटले

या प्रकरणी संबंधित तहसीलदारांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन देऊन आपली कैफियत मांडली होती. त्यावेळी बावनकुळे यांनी या प्रकरणात लक्ष घालून प्रश्न सोडवण्याचे अश्वासन दिले आहे. मात्र, आश्वासन देऊन चार महिने उलटले तरी पदोन्नतीबाबत शासन स्तरावर हालचाल होत नसल्याने हे अधिकारी आज पुन्हा महसूलमंत्र्यांकडे दाद मागणार आहेत.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने २००४ मध्ये २० अधिकाऱ्यांची नायब तहसीलदारपदी निवड केली होती. या २० अधिकाऱ्यांना पुढे तहसीलदार म्हणून पदोन्नती मिळाली.

# भाजपाच्या मोर्चामुळे मुंबईत कोंडी; महिलेने महाजन यांना सुनावले खडेबोल

## लोकांना ट्रॅफिकमध्ये का अडकवता?" असा सवाल करत तिने आपला संताप व्यक्त केला

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** लोकसभेत महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक नामंजूर झाल्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टीने मुंबईतील वरळी डोम येथे 'जन आक्रोश महिला संमेलन' आयोजित केले होते. मात्र, या आंदोलनामुळे झालेल्या प्रचंड वाहतूक कोंडीचा फटका बसलेल्या एका महिलेने थेट मंत्री गिरीश महाजन यांनाच खडेबोल सुनावले. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. भाजपाच्या या मोर्चामुळे वरळी आणि परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. तासनतास वाहतूक कोंडीत अडकल्यामुळे एका महिलेचा संयम सुटला. तिने थेट मोर्चाच्या ठिकाणी जाऊन गोंधळ घातला आणि समोर असलेल्या मंत्री गिरीश महाजन यांना जाब विचारला. "विरोध करायचा असेल तर मैदानात करा, लोकांना ट्रॅफिकमध्ये का अडकवता?" असा सवाल करत तिने आपला संताप व्यक्त केला. यावेळी पोलीस आणि महिला आंदोलकांमध्येही शाब्दिक चकमक उडाली.वाहतूक कोंडीचा फटका बसलेल्या एका महिलेने थेट मंत्री गिरीश महाजन यांनाच खडेबोल सुनावल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.या घटनेवरून आमदार रोहित पवार यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. "केवळ 'हिज मास्टर्स




व्हॉईस'ला खूष करण्यासाठी लोकांना तीन-तीन तास वेठीस धरणे चुकीचे आहे. आंदोलनाचे कारण खोटे असेल तर लोक अशीच फजिती करतात," असे ट्विट पवारांनी केले आहे. तसेच, संबंधित महिलेवर कारवाई न करता सत्ताधाऱ्यांनी आत्मपरीक्षण करावे, असा सल्लाही त्यांनी दिला."महिला आरक्षणाच्या नावाखाली खोटे नॅरेटिव्ह पसरवणाऱ्या भाजपाचा खरा चेहरा या धाडसी भगिनीने उघडा पाडला आहे. महिलांचा केवळ राजकीय साधन म्हणून वापर करणाऱ्या भाजपचा संविधान बदलण्याचा डाव 'इंडिया' आघाडीने याआधीच हाणून पाडला होता. आज केवळ एका मंत्र्याला सुनावले आहे, पण येणाऱ्या काळात देशातील महिला भाजपला सत्तेतून हाकलून लावल्याशिवाय राहणार नाहीत. भाजपा भगाओ, देश बचाओ!", अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.भाजपाच्या या मोर्चामुळे वरळी आणि परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. तासनतास वाहतूक कोंडीत अडकल्यामुळे एका महिलेचा संयम सुटला. तिने थेट मोर्चाच्या ठिकाणी जाऊन गोंधळ घातला आणि समोर असलेल्या मंत्री गिरीश महाजन यांना जाब विचारला. "विरोध करायचा असेल तर मैदानात करा, लोकांना ट्रॅफिकमध्ये का अडकवता?" असा सवाल करत तिने आपला संताप व्यक्त केला. यावेळी पोलीस आणि महिला आंदोलकांमध्येही शाब्दिक चकमक उडाली.वाहतूक कोंडीचा फटका बसलेल्या एका महिलेने थेट मंत्री गिरीश महाजन यांनाच खडेबोल सुनावल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.या घटनेवरून आमदार रोहित पवार यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. "केवळ 'हिज मास्टर्स व्हॉईस'ला खूष करण्यासाठी लोकांना तीन-तीन तास वेठीस धरणे चुकीचे आहे. आंदोलनाचे कारण खोटे असेल तर लोक अशीच फजिती करतात," असे ट्विट पवारांनी केले आहे. तसेच, संबंधित महिलेवर कारवाई न करता सत्ताधाऱ्यांनी आत्मपरीक्षण करावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

# मीनल करनवाल यांचा राज्यस्तरीय सन्मान

जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांचा 'प्रशासकीय गतिमानता आणि नाविन्यपूर्ण उपक्रम' या राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव करण्यात आला आहे. विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि प्रशासनातील नाविन्यपूर्ण उपक्रम राबवल्याबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला. या पुरस्कारांतर्गत मीनल करनवाल आणि करिश्मा नायर यांना द्वितीय क्रमांकाचा




पुरस्कार मिळाला. जिल्ह्यातील विविध विकास योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे प्रशासन अधिक गतिमान व परिणामकारक झाल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. तसेच, वाशिम जिल्ह्यातील 'खत उपलब्धता पोर्टल' या अभिनव उपक्रमासाठी कृषी विकास अधिकारी अभिजीत देवगिरकर यांना तृतीय पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. शेतकऱ्यांना खत उपलब्धतेची माहिती सुलभपणे मिळावी आणि वितरण प्रक्रिया पारदर्शक व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. नाविन्यपूर्ण कामगिरीची दखल या पुरस्कारांमुळे राज्यातील प्रशासनात नाविन्यपूर्ण कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कामगिरीला प्रोत्साहन मिळत असून, इतर जिल्ह्यांसाठीही प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे. जळगाव जिल्हा परिषदेच्या कामकाजाची राज्यस्तरावर दखल घेतली जात असल्याने जिल्ह्यासाठी हा अभिमानाचा क्षण मानला जात आहे.

# एसटीच्या २.५७ मेगावॉट ग्रीड सोलर प्रकल्पास मंजुरी

## एसटीचा तीन चार कोटी खर्च वाचणार



जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** काही दिवसांनी तुम्हाला एस टी स्टँड, एस टी चे आगार कार्यशाळा येथे मोठमोठे सोलर पॅनल दिसले तर आश्चर्य वाटून घेऊ नका कारण राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) विविध बसस्थानके, कार्यालये, कार्यशाळा आणि आगारांच्या छतांवर ग्रीड सोलर ऊर्जा प्रणालीद्वारे वीज निर्मिती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या प्रकल्पासाठी सुमारे १३ कोटी ३ लाख खर्चास प्रशासकीय व वित्तीय खर्चास मान्यता देण्यात आली. एसटीच्या ऊर्जा वापरात मोठी बचत होऊन पर्यावरणपूरक पाऊल उचलले जाईल, अशी माहिती परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिली. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे एसटी महामंडळाच्या बसस्थानके, कार्यशाळा, कार्यालये आणि इतर आस्थापनांमध्ये सौरऊर्जेचा वापर वाढणार आहे. यामुळे एसटीसाठी दरवर्षी होणारा सुमारे ३ ते ४ कोटी रुपयांचा पारंपरिक वीज खर्च वाचणार आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी करताना नमुना नकाशे, तांत्रिक मान्यता आणि पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. हा उपक्रम हरित ऊर्जा वापराच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. ऊर्जा बचत, पर्यावरण संवर्धन आणि आर्थिक शिस्त या तिन्ही बाबींमध्ये सकारात्मक परिणाम अपेक्षित असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. एस टी महामंडळाला दिवसाला एक दीड कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. काही दिवसांनी तुम्हाला एस टी स्टँड, एस टी चे आगार कार्यशाळा येथे मोठमोठे सोलर पॅनल दिसले तर आश्चर्य वाटून घेऊ नका कारण राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) विविध बसस्थानके, कार्यालये, कार्यशाळा आणि आगारांच्या छतांवर ग्रीड सोलर ऊर्जा प्रणालीद्वारे वीज निर्मिती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज | ज

# मांडवा येथे उभा राहणार मरिना प्रकल्प; आराखडा तयार करण्याचे निर्देश

## १५ दिवसांत निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याचे कडक निर्देश संबंधित विभागाला दिले

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** तालुक्यातील मांडवा येथे लवकरच मरिना प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे पंधराशे कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. येत्या आठ दिवसांत या प्रकल्पाचा आराखडा तयार होऊन टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली पाहिजे, असे निर्देश राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. मांडवा परिसरात सध्या बोटी उभ्या करण्यासाठी योग्य सुविधा नसल्याने भरती-ओहोटीच्या काळात मोठ्या अडचणी निर्माण होतात. वाढते पर्यटन आणि तालुक्याचा विकास लक्षात घेता जेट्टीजवळ मरिना उभारण्याची मागणी आमदार आ. महेंद्र दळवी यांनी केली होती. या मागणीची दखल घेऊन मंत्री राणे यांनी मंगळवारी मंत्रालयात विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती.या बैठकीत मांडवा येथील मरिना उभारणीबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. अखेरीस अत्याधुनिक 'मरिना' उभारण्याचा निर्णय निश्चित करण्यात आला.



मंत्री राणे यांनी या प्रकल्पाचा आराखडा तातडीने तयार करून पुढील 15 दिवसांत कामाची निविदा निघाली पाहिजे, असे स्पष्ट निर्देश दिले.मांडवा येथे मरिना उभारण्यात आल्यास छोट्या प्रवासी बोटी, यॉट्स आणि लहान जहाजांसाठी सुरक्षित बंदर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पर्यटन, रोजगारनिर्मिती, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. तसेच पायाभूत सुविधांचा विकास होऊन मांडवा हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील बंदर म्हणून ओळख निर्माण करू शकते. तालुक्यातील मांडवा येथे लवकरच मरिना प्रकल्प उभारला जाणार आहे.

### भरती-ओहोटीच्या काळात मोठ्या अडचणी

या प्रकल्पासाठी सुमारे पंधराशे कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. येत्या आठ दिवसांत या प्रकल्पाचा आराखडा तयार होऊन टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली पाहिजे, असे निर्देश राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. मांडवा परिसरात सध्या बोटी उभ्या करण्यासाठी योग्य सुविधा नसल्याने भरती-ओहोटीच्या काळात मोठ्या अडचणी निर्माण होतात.